# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०/०४/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०३) इतिवृत्त

**बुधवार, दिनांक ३० एप्रील २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी ११-३० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त, नगरसचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

1. श्री. संजय रामदास जोशी
2. श्री. अ. रशीद खान
3. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
4. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
5. श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
6. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
7. श्री. खान जावेद हसन खान
8. श्री. कचरू सोनवणे
9. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
10. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
11. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
12. श्री. नारायण तिलोकचंद कुचे

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : मुख्य पशुसंवर्धन अधिकारी डॉ.रझवी साहेब हे आज सेवानिवृत्त होत आहे. त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे : आताच स. श्री.अ. रशिद खान मामू यांनी जी सुचना माडंली त्यास माझे अनुमोदन आहे.

**विषय क्र. 12 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, चिकलठाणा आठवडी बाजार दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीत फी वसुलीचा ठेका देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/271/2008, दिनांक 27-2-2008 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन दिनांक 5-3-2008 रोजी जाहीर लिलाव ठेवला असता अटी शर्ती नुसार एकाही ठेकेदाराने कागदपत्रांची पुर्तता न केल्याने बोली रद्द करून फेर लिलाव/बोली मागविण्यासाठी मान्यता मिळाल्याने जा.क्र.मनपा/मामअ/401/2008, दिनांक 14-3-2008 रोजी अल्पमुदतीची दुसरी वेळ म्हणुन चिकलठाण बाजार फी वसुलीसाठी जाहीर लिलाव/निविदा प्रसिध्दीस दिली असता व प्रत्यक्षात दि.18-3-2008 रोजी बोली ठेवली असता एकाही ठेकेदाराने अनामत रक्कम व प्रोसेसिंग चार्जेस न भरल्याने लिलाव होऊ शकला नाही.

त्याच दिवशी गतवर्षीच्या फी वसुलीचे ठेकेदार श्री.उमेश शिवलाल परदेशी ह्यांनी अर्ज देऊन मागील वर्षीच्या फी वसुली ठेका रक्कम रू.9100/- प्रती बाजार ठेक्यापेक्षा जास्त रक्कम रू.300/- वाढवून रक्कम रू.9400/- प्रती बाजार घेण्यासाठी तयार आहे, असे लेखी दिल्याप्रमाणे संचिका सादर केली असता श्री.उमेश शिवलाल परदेशी यांनी प्रती बाजार रू.9400/- घेवुन ठेका द्यावा किंवा तिसऱ्यांदा फेर निविदा काढावी तेव्हा मा.आयुक्त यांनी रक्कम रू.9400/- प्रती बाजार श्री.उमेश परदेशी यांच्या प्रस्तावास मंजुरी दिलेलीआहे.

तरी श्री.उमेश शिवलाल परदेशी यांना दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी रक्कम रू.9400/- प्रती बाजार प्रमाणे प्रचलित अटी शर्तीनुसार देणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : 22 एप्रिल रोजी स्थायी समितीच्या विषयपत्रिकेवर क्र. 10 पर्यत विषय होते त्यानंतर ही बैठक होत आहे आजच्या बैठकीच्या विषय पत्रिकेवर क्र. 12 पासून सुरूवात आहे 11 नंबरचा विषय कोणता होता, माहिती द्यावी.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :मागिल बैठकीत क्र. 11 हा प्रशासकीय विषय उपकर संबधी होता. त्यास मान्यता दिली आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :आजच्या बैठकीला मागिल सभेचे इतिवृत्त दिलेले नाही प्रत्येक बैठकीला मागिल सभेचे इतिवृत्त देण्याची यापुढे कार्यवाही व्हावी. |
| श्री.सतीश कटकटे | : मागिल बैठकीत विषय क्र. 6 हा रविवार आठवडी बाजार ठेका देण्या संदर्भात होता. मंजूर केला त्या संदर्भात अटी शर्ती काय होत्या संबधीत ठेकेदाराकडे किती रक्कम बाकी आहे. तेवढी मालमत्ता त्यांचेकडे आहे का वसुली कशी करणार अटी शर्ती काय होत्या माहिती द्यावी. |
| श्री.अ.रशिद खान | : मा. आयुक्त उपआयुक्त बैठकीला नाही आठवडी बाजार संदर्भात प्रश्न विचारला संबधीत उपआयुक्त ही नाही. कोण खुलासा देणार आहे. |
| मा.सभापती | : उपआयुक्त प्रशासन हे कामानिमित्त बाहेरगांव गेलेले आहे. मा.आयुक्त सभेला येत आहेत. |
| श्री.अ.रशिद खान | : यापुढे सर्व अधिकारी यांनी वेळेवर सभागृहात उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात याव्या. |
| श्री.सतीश कटकटे | : उपआयुक्त महसूल यांचे संबधीत प्रश्न विचारलेला आहे. 10 लक्षचा ठेका देत आहे. ते भरणा करणार की नाही पुन्हा ठेका देत आहोत वसूली कशी करणार माहिती द्यावी. त्याची मालमत्ता तेवढी आहे की नाही. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : जे विषय समोर आलेले आहे. त्या संदर्भात सर्वच सदस्यांच्या भवना आहे की अटी व शर्ती प्रस्तावात यायला पाहिजे. जे ठराव येतात त्या संदर्भात प्रशासनाने संपूर्ण माहिती प्रस्तावात देणे गरजेचे आहे. तशा सूचना देण्यात याव्यात. |
| श्री.सतीश कटकटे | : मागिल बैठकीत विषय क्र. 6 हा रविवार आठवडी बाजार प्रति बाजार 28,900 रू प्रमाणे ठेका दिला. ठेका देण्यासाठी अटी शर्तीच्या अधीन राहून असे म्हटलेले आहे त्या अटी शर्ती काय आहे माहीती द्यावी. |
| मा.सभापती | : उपआयुक्त महसूल यांनी खुलासा करावा. |
| उपआयुक्त (म) | : विषय क्र. 12 हा चिकलठाणा येथील आठवडी बाजार ठैका देण्या संबधीचा असून या बाजाराची दोन वेळेस जाहिर निविदा देवून सुध्दा काहीही प्रतिसाद नसल्याने 9400 प्रती बाजार प्रमाणे प्रचलित अटी शर्ती नुसार देण्यात प्रस्ताव ठैवलेला आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : 12 नंबरचा विषय वाचलेला आहे. परंतू ज्या व्यक्तीला ठेका देणार आहोत त्यांचा मागचा रेकॉर्ड काय आहे. अटी शर्ती काय आहेत तो व्यक्ती ब्लॅकलिस्ट होण्या मागे आहे काय पुर्ण पैसे त्यांनी जमा केले की धनादेश दिलेले आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : बाजारचा ठेका दिला त्यानंतर 5-10 लक्ष बाकी राहिल्यास ती वसुली करण्यासाठी काय उपाययोजना आहे. गॅरन्टरी म्हणून काय घेतले जाते. अटी शर्तीचे पुर्णपणे पालन होते का? ठेकदार पैसे जमा करतात, घेवून जातात वर्षभर अधिकारी वसूलीकडे लक्ष देत नाही. पुन्हा टेंडर काढले जाते हे कितपत योग्य वाटते, मागिल वसूली कोण करणार आहे.<br>(मा. आयुक्त सभागृहात प्रवेश करतात. ) |
| उपआयुक्त(म) | : सदर ठेकेदाराकडे चिकलठाणा बाजाराचा मागिल वर्षाची कुठलीही थकबाकी नाही. |
| श्री.सतीश कटकटे | : रविवार बाजारच्या ठेकेदाराकडे मागिल वर्षाचे 2.68 लक्ष बाकी आहे. प्रशासनाचे चार दिवसापूर्वी पत्र माझेकडे आहे त्यात नमूद केले आहे. |
| उपआयुक्त (म) | : हा विषय वेगळा आहे रविवार बाजारचा वेगळा होता. |
| श्री.सतीश कटकटे | : मागिल बैठकीतील विषया बध्दल बोलतो आहे कोणत्याही बाजारची मागिल थकबाकी असेल तर कोणत्या अटी शर्ती नुसार होवू शकेल त्या अटी शर्ती काय असतात माहिती द्यावी. |
| उपआयुक्त (म) | : बँक गॅरन्टी घेतो त्याशिवाय करारनामा करीत नाही. |
| श्री.सतीश कटकटे | : सदर व्यक्तीकडे 2 ते 2.50 लाख बाकी आहे. मला पत्र दिले आहे. त्यांनी निविदा घेतली. 5 लाखाची कशी घेणार. बँक गॅरन्टी किती रक्कमेची आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : यात रविवारचा आठवडी बाजार असे दिले जाफरगेटच्या बाजारावर बाकी आहे आम्ही त्याचा उल्लेखच केला नाही प्रशासन प्रस्ताव पाठवून मोकळे होते. ही चुकीने की जाणूनबूजून केलेले आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : बाजार कोणताही असेल मागिल वसूली केलेली नाही. अनेक ठेकेदाराकडे थकबाकी आहे. या संदर्भात काही अधिका-यावर कार्यवाही सुध्दा झाली तरी |

प्रशासनाने सुधारणा केली नाही. अटी शर्ती म्हणजे काय, वर्षाचा ठेका किती रकमेचा माहिती द्यावी.

उपआयुक्त (महसूल) : ठिक आहे दुरूस्ती केली जाईल. बँक गॅरन्टी घेतो त्यानूसार वसूली केली जाईल.

श्री.अ.रशिद खान मामू : हा प्रस्ताव चिकलठाणा बाजार संबधी आहे परंतू रविवारचा बाजार ठेका दिला त्या ठेकेदार कडून बँक गॅरन्टी घेवून सुध्दा भरणा केली नाही. त्यांचेकडे 2.50 लाख बाकी आहे. पुन्हा ठेका दिला या वर्षी पुर्ण रक्कम भरणा केली नाही तर काय कार्यवाही करणार मागिल बाकी कशी वसूल करणार आहे. त्यासाठी ज्यांनी ठराव दिला त्या अधिकारी यांनी संपूर्ण माहितीसह सादर करावे.

मा. सभापती : अटी शर्ती काय आहे खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) : चिकलठाणा आठवडी बाजार ठेका देण्याच्या अटी शर्ती पुढील प्रमाणे ज्या व्यक्तीच्या नावे मालमत्ता कर तसेच पाणीपटटी कर थकबाकी असेल त्या व्यक्तीला बोली बोलता येणार नाही. महापालिकेचे बाजार किंवा निविदा रक्कमेची थकबाकी असणा-या थकबाकी दाराची बोली स्वीकारली जाणार नाही. कार्यालयाने ठरवून दिलेल्या आधारभूत रक्कमेपेक्षा अधिक रक्कमेने सुरूवात केली जाईल. लिलावातील सर्वोच्च बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महापालिकस राहिल.लिलावातील बोली स्विकारल्यानंतर व बोलीच्या 25 टक्के रक्कम भरणा केल्यावर दर महिण्याच्या 5 तारखेला पुर्वी वसुली केलेला बाजारच्या रक्कमेचा भरणा कार्यालयात जमा करावा लागेल. महापालिकेने ठरवून दिलेले दराचे पत्रक बाजाराच्या प्रवेशद्वारावर लावावे लागेल.कार्यालयाने ठरवून दिलेल्या दराने बाजारातील वसूली करणे बोलीधारकास बंधनकारक राहील. यापेक्ष जास्त दराने फि वसूल करीत असल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार महापालिकेस राहिल.

श्री.रविकांत गवळी : नियम योग्य आहे परंतू स्थानिक लोकांच्या तक्रारी येतात नियमानुसार कार्यवाही होते का? आताच म्हटले की थकबाकी असेल तर बोली मध्ये बोलता येणार नाही परंतू परस्थिती अशी असते की एकाच व्यक्तीचे पाच लोक असतात प्रत्येक वर्षी एक एक ठेकेदार बाकी ठेवतो. मागिल बैठकीत विषय क्र. 6 मध्ये अशोक बियानी यांना ठैका दिला त्यांचा श्री.गवळी मित्र आहे त्यांचेकडे 4-00 लक्ष थकबाकी आहे. नाव बदलतात वसुली मिळून करतात. श्री.गवळी नावाचे ठेकेदार आजही वसूली करतो नाव बियानीचे आहे. याकडे कुणी लक्ष दयायचे.सलीम अली सरोवर संदर्भात मागच्या वेळी ठैका दिला त्या ठेकेदाराविरूध्द किमान 50 लोकाच्या तक्रारी आल्या. सदर व्यक्ती हे आरेरावीची भाषा करून पैसे वसूल करतो.त्या व्यक्तीवर काय कार्यवाही केली.

श्री.सतीश कटकटे : आताच रेटच्या सदर्भात उल्लेख केला.जाफरगेटला गेटच नाही तर कुठे लावणार आहे आणि रेट तक्ता हा महापालिकेने कि ठेकेदाराने लावायला पाहिजे. मागिल वेळे रेटचा तपशील लावलेला होता का?

मा.आयुक्त : दर्शनी भाग जेथे असेल तेथे लावावयास पाहिजे. आपण निर्णय घ्यावा जेथे लावायचे तेथे लावण्यात येईल.

मा.सभापती : महापालिकेने दराचा तपशिल लावायला पाहिजे.

श्री.सतीश कटकटे : मागिल काही ठेकेदारानी बाजारच्या रक्कम वसूल केली महापालिकेचे त्या ठेकेदाराकडे जवळपास 4 लक्ष थकबाकी आहे ती वसूली कोण करणार आहे.

मा.आयुक्त : चार लक्ष होण्यासाठी खूप आठवडे लागतात. हा ठेका प्रति बाजार 9,400 रू. आहे. जर एक दोन किंवा तिसरा हप्त्यापर्यंत रक्कम भरणा केली नाही तर रद्द करता येते.

श्री.सतीश कटकटे : 4 लक्ष रूपये थकबाकी आहे थकबाकी होत गेली तेंव्हाच पत्र वगैरे देवून कार्यवाही का केली नाही. वसुलीची कार्यवाही का केली नाही. 4 लक्ष बाकी आहे संबधीताच्या नावावर एक लक्षची मालमत्ता नाही.कशी वसूली करणार आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :आजपर्यत मागिल वर्षी किती व कुणाला व किती रक्कमेत ठेका दिला व दिल्यानूसार तेवढया रक्कमेची वसुली झालेली आहे का किती ब्लॅक लिस्टेड आहे, दुस-यांचे नाव दाखवून कुणाला ठेका दिला काय, मागिल वसुली झाली नसेल तर त्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे. याची संपूर्ण माहिती प्रशासनाने पुढील बैठकीपर्यत सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना लेखी द्यावी.

श्री.अ.रशिद खान :ज्यांचेकडे थकबाकी आहे त्यांना ब्लॅक लिस्ट करावे. पुन्हा बाजारचा ठेका घेतल्याचे निदर्शनास आल्यास अनामत रक्कम जप्त करावी. 4 लक्ष पर्यत थकबाकी होत असेल तर बँकगॅरन्टी घेवून उपयोग काय? दुसरा किंवा तिसरा बाजार पर्यत रक्कम भरणा केली नाही तर पुढील कार्यवाही करणे गरजेचे आहे. जोपर्यंत कडक कार्यवाही करणार नाही तोपर्यत असे प्रकार बंद होणार नाही.

श्री.सतीश कटकटे : यापुर्वी लाखोचा घोटाळा झाला. दोन कर्मचा-यांना निलंबीत केले पुन्हा घेतले. पुन्हा तीच वेळ आली. जर अटी शर्ती घालून दिल्यानंतर त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसेल तर योग्य नाही.

श्री.संजय जोशी : यावर असा पर्याय निघू शकतो ज्या दिवशी बाजार झाला त्या दिवसापासून कार्यालयीन कामकाजाचे पुढील दोन दिवस कार्यालयीन वेळेपर्यत बाजाराची रक्कम भरणा करण्याची सक्ती करावी.त्या मुदतीत रक्कम भरणा न केल्यास योग्य ती दंडात्मक कार्यवाही करावी.ही अट असावी जेणे करून जे बोगस ठेका घेतात तेही घेणार नाही जे रक्कम भरणा करीत नाही त्यावर ही बंधन येईल.

श्री.वसंत नरवडे : 9400/- रू. चा एक बाजारचा ठेका आहे. त्या प्रमाणे महापालिकेनेच तिकीट छपाई करून त्या ठैकेदारास जर 9400 रू च्या रक्कमेपेक्षा जास्त तिकीट लागत असतील तर देण्यात यावे. त्या ठेकेदाराचे पैसे डिपॉजीट झाल्यानंतर तिकीट दिले तर हा प्रश्न होत असलेले आरोप उदभवणार नाही. बोगस तिकीट आढळून आले तर त्याच दिवशी कार्यवाही करावी. जेवढी बॅक गॅरन्ट घेतो तेवढे डिपॉजीट ठेवून बाजारच्या अगोदर तिकीट दयावे. जेवढे डिपॉजीट तेवढेच पर्यतचे तिकीट दयावे.दर आठवडयाच्या बाजारच्या दिवशी अगोदर रक्कम भरणा करून तिकीट घेवून जावे हा योग्य उपाय राहील. यात भ्रष्टाचारास आळा बसेल.

मा.आयुक्त : तिकीट छापून दिले तर कमी लोक बसले होते असे दाखवतील.

श्री.वसंत नरवडे पाटील : 9400 रूपये पर्यतचे आपण मालक त्यास किती उत्पन्न मिळेल देणे घेणे नाही. 9400 साठी 15000 चे तिकीट घेवून जाईल. तिकीट छपाई करावे बाजारचा वार तारीख वाईज शिक्का टाकून देण्याचे काम राहिल.

मा.आयुक्त : 9400 चे तिकीट दिले तर त्या पेक्षा कमी वसूली झाली असे म्हणेल.

श्री.वसंत नरवडे पाटील :9400 रू. किमतीचे तिकीट देणे कम्पलसरी राहिल. त्यापेक्षा जास्त लागत असतील तर दयावे.

श्री.सतीश कटकटे : तिकीट देवून हे सक्सेस होणार नाही.

श्री.वसंत नरवडे : हा अभ्यास केलेला नाही. बी ॲंड सी चे टोलनाक्यावर तिकीट आहे. त्याप्रमाणे वसूली केली जाते.

श्री.सतीश कटकटे : टोलनाक्यावरून किती गाडया येतात जातात लगेच कळते बाजारात कोण कुठे बसतो हे माहित नसते. तिकीट देवून सक्सेस होणार नाही.

श्री.अ.रशिद खान : 9400 चे ऐवजी 10000 हजार किमतीचे तिकीट द्यावे.

मो. आयुक्त : त्यांचे हातात तिकीटच नसतात ते वाटणार कसे. टोलनाक्यावर जी वसूली होते ती टोलचे पैसे वाढविण्यासाठी करीत नाही. टॅक्सेस वाचविण्यासाठी करतात.

श्री.वसंत नरवडे : 5000 पर्यत धंदा झाला असे म्हणेल. 9400 चे तिकीट दिल्याशिवाय देवू नये. नसता महापालिकेचे दोन कर्मचारी द्यावे.

मा.आयुक्त : दोन आठवडयाचे ॲडव्हान्स घेवून तिस-या आठवडयाचे बाजारचा दिवस झाल्यानंतर मुदतीत न भरणा केल्यास योग्य ती कार्यवाही करता येईल अशी अट ठेवता येईल.

श्री.सतीश कटकटे : एक चतुर्थांश रक्कम भरणा करून घ्यायला पाहिजे अटी शर्तीमध्ये आहे. मालमत्ता पाणीपटटीची थकबाकी 1000-500 पर्यंत असते ते भरणा करून ठेका घेतात. मुळात बाजारची रक्कम भरणा न केल्यास वसूली कशी करणार आहे.

मा.आयुक्त : यावर असा मार्ग निघू शकतो की चार आठवडयाचे किंवा एक चतुर्थअंश रक्कम ॲडव्हॉन्स घ्यायची आणी त्या आठवडयाच्या पूढील कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी सध्याकाळी 4-00 वाजेला रक्कम जमा करायची नाही केले तर एक आठवडयासाठी दंडात्मक कार्यवाही करू.सलग दोन आठवडे हप्ता थंबविला तर टेंडर रद्द करण्याची कार्यवाही करता येईल.

श्री.कचरू मोरे : ज्या ठेकेदाराकडे थकबाकी आहे ती वसूल करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे. तसेच महापालिकेने तिकीट छपाई करून स्टेशनरीवर खर्च करून खर्च करून

हे सक्सेस होणार नाही त्यासाठी बाजारचा दिवसानंतर पुढील कार्यालयीन वेळेचे दोन दिवसाच्या आत सध्याकाळ पर्यत रक्कम भरणा करण्याची सक्ती करावी ज्यांनी महानगरपालिकेची फसवणूक केली कायदेशिरदृष्टया त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करणे किंवा त्यांचे विरूध्द न्यायालयात दाद मागता येते का याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त : कुणाकडे किती थकबाकी आहे त्याची यादी करून मालमत्ता व पाणीपटटीची थकबाकी असेल ती महापालिकेची थकबाकी म्हणून वसूल करता येते.

श्री.अ.रशिद खान : एक ग्रुप मिळून सर्वच बाजारचा ठेका घेतात रक्कम भरणा करीत नाही. त्यांना ब्लॅकलिस्ट करावे जेणे करून असे बोगस प्रकार घडणार नाही. 4 लक्ष थकबाकी पर्यत कार्यवाही का केली नाही.

श्री.वसंत नरवडे : जी हप्त्याची रक्कम घ्यायची ती कॅश रूपाने घ्यावी धनादेश घेवू नये अनेक धनादेश वटवले जात नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : वर्षभरापासून आजपर्यत ज्यांना ठेका दिला त्यांचेकडे थकबाकी आहे का, असेल तर का ठेवली. कशामूळे राहिली वसुली करण्याकरीता काय उपाययोजना करणार आहे. योग्य ती कडक कार्यवाही करून पूढील बैठकीत सर्व सदस्यांना माहिती द्यावी.

श्री.अ.रशीद खान :पुढील हप्त्याच्या दोन दिवसपर्यत रक्कम जमा करणे सक्तीचे करावे जर मूदतीत रक्कम भरणा केली नाही तर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या दुरूस्तीसह मंजूरी द्यावी.

श्री.रविकांत गवळी : या विषयावर सविस्तर चर्चा झाली मंजूर करण्यास हरकत नाही. मंजूर केल्यानंतर अटी शर्ती नुसार अमलबजावणी करण्याची दखल घ्यावी.

श्री.वसंत नरवडे : 31 तारखेपर्यत ठेका होता गेल्या तीन आठवडयाची वसूली कुणी केली यात 27-28 हजारचे महापालिकचे नुकसान होईल. तीन आठवडयाच्या रक्कमेसह बाजारची रक्कम भरणा करून घ्यावी.

श्री.संजय जोशी : धनादेश द्वारे बाजारचे पेमेन्ट कधीच ्घेतले जात नाही मागिल दोन वर्षापूर्वीच्या भ्रष्टाचार नंतर धनादेशाद्वारे पेमेन्ट घेणे बंद केले होते आता कायमसाठी बंद करावे.कॅश रक्कम भरणा करावी पावती घ्यावी. अशी अट टाकावी.

मा.सभापती : मागिल कालावधीतील ज्या ज्या लोकांकडे थकबाकी आहे त्याची यादी तयार करून सर्व सदस्यांना देण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :कुणाकडे कोणत्या बाजाराची किती रक्कम थकबाकी आहे माहिती समोर आल्यानंतर चर्चा करून योग्य तो निर्णय घेता येईल.

मा.सभापती : जुने पैसे बाकी आहे त्याची सर्वांना माहिती द्यावी. या संबधीची माहिती समोर आल्यानंतर या समितीच्या सदस्या सोबत एकत्रित चर्चा करून प्रशासनाकडे प्रपोज केलेजाईल.ज्या ज्या सुचना स.सदस्यांनी केल्या त्यानुसार दुरूस्ती करून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आठवडी बाजारचा ठेका देतांना प्रशासनाने पूढील बाबीचा अवलंब करणे आवश्यक आहे

01. आठवडी बाजारचा ठेका देतांना सदर व्यक्तीचे मागिल रेकॉर्ड बघूनच कार्यवाही करावी.

02. ज्या ठेकेदाराकडे बाजाराची थकबाकी असेल ती नियमाने कार्यवाही करून वसूल करावी.कोणत्या बाजाराची किती थंकबाकी आहे व कशामूळे ती राहिलेली आहे याची लेखी माहिती सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना पुढील बैठकीपर्यत देण्यात यावी.

03. यापूढे सविस्तर प्रस्ताव सभागृहासमोर सादर करण्याची दखल घ्यावी.

04. आठवडी बाजार दिवस नंतर दोन दिवसाच्या आत संबधीत ठेकेदार यांनी आठवडी बाजारची रक्कम कॅश रूपाने भरणा करावी.मुदतीत भरणा न केल्यास स्थायी समिती ठरवेल त्या टक्केवारी प्रमाणे थकीत रक्कमेला दंड आकारणी करावी.

या दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा आठवडी बाजार दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीत फी वसुलीचा ठेका देण्यासाठी, गतवर्षीच्या फी वसुलीचे ठेकेदार श्री.उमेश शिवलाल परदेशी ह्यांनी अर्ज देऊन संमती दिल्यानुसार गतवर्षीच्या ठेका रक्कमेपेक्षा जास्त रक्कम रू.300/- वाढवून रक्कम रू.9400/-

प्रती बाजार प्रमाणे देण्यास तयार असल्याने, दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी रक्कम रू.9400/- प्रती बाजार प्रमाणे आठवडी बाजार फी वसुलीसाठी प्रचलित अटी शर्तीनुसार तसेच आठवडी बाजाराच्या दिवसाच्या पुढील दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसात त्यांनी बाजाराची फी वसुलीची रक्कम रू.9400/- रोख स्वरूपात मनपाकडे जमा करावी व त्यानंतरच्या कालावधीसाठी योग्य ते दंड आकारणी करणे, या दुरूस्तीसह श्री.उमेश शिवलाल परदेशी यांना देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 13 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रतापनगर स्मशानभुमी विकसीत करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,24,837/- इतकी असुन या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा विक्री झाल्या होत्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत पाच निविदा प्राप्त झाले असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर (अं.प.दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | गोसावी एस. के. | 13.33% कमी |
| 2. | व्ही. एस. देशमुख | 8.59% कमी |
| 3. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 6.60% कमी |
| 4. | बी. बी. खंडागळे | 9.70% जास्त |
| 5. | अरविंद जिजाराव शेजुळ | 17.00% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री.गोसावी एस.के. यांचे असुन त्यांच्या निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.33% कमी असुन त्यांची निविदा स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रतापनगर स्मशानभुमी विकसीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृश्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.33% कमी दराची श्री. गोसावी एस. के. यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 14 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद टाईम्स कॉलनी, त्रिवेणीनगर येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,02,200/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, 2 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर (अं.प.दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | एल. के. कन्स्ट्रक्शन | 8.92% कमी दराने |
| 2. | मुबारक मेहबुब पठाण | तांत्रिकदृष्ट्या बाद |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी एल.के. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 8.92% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एल.के. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 8.92% ने कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद टाईम्स कॉलनी, त्रिवेणीनगर येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.92% कमी दराची एल. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 15 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,18,910/- च्या अंदाजपत्रकाच्या कामासाठी फेर निविदापत्रके मागविली असता, 2 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मकद तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर (अं.प.दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | हायवे कन्स्ट्रक्शन | 21.39% कमी दराने |
| 2. | आर. के. कन्स्ट्रक्शन | 4.99% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी हायवे कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.39% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी हायवे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.39% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.39% कमी दराची हायवे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 16 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील सिडको भागातील खोलगट रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी रस्त्यांची दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,86,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर (अं.प.दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | रे कन्स्ट्रक्श | 15.00% जास्त दराने |
| 2. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 30.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी रे कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेाा 15.00% ने जास्त आहेत. त्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.34,33,643/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी **रे कन्स्ट्रक्शन** यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको भागातील खोलगट रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी रस्त्यांची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.00% जास्त दराची **रे कन्स्ट्रक्शन** यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 17 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील स.नगरसेवक यांना सन 2007-08 चे सुधारीत आणि सन 2008-09 चे मुळ अंदाजपत्रक पुस्तिका वितरण करण्यासाठी प्रतिवर्षी प्रमाणे सुटकेस खरेदी करणे करीता ॲरीस्टोक्रेट कंपनीचे ग्लोबस यु पी एस पी 55 हे मॉडेल रू.5290.00 किंमतीचे असून कंपनी महानगरपालिकेच्या सुटकेस खरेदी करीता 20% सुट रू.1058/- देण्यास तयार असल्याचे पत्र ॲरीस्टोक्रॅट कंपनीचे स्थानिक विक्रेते मे.सागर लगेज यांनी दिले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस एक सुटकेस रू.4232/- मध्ये प्राप्त होत असुन एकुण 104 सुटकेस खरेदीसाठी रू.4,40,128/- इतका खर्च येत आहे.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2) (2) नुसार मे. सागर लगेज, अधिकृत विक्रेते, ॲरिस्टोक्रॅट यांचेकडून एम.आर.पी. पेक्षा 20% कमी दराने खरेदीस मान्यता देणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील स.नगरसेवक यांना सन 2007-08 चे सुधारीत आणि सन 2008-09 चे मुळ अंदाजपत्रक पुस्तिका वितरण करण्यासाठी प्रतिवर्षी प्रमाणे सुटकेस खरेदी करणे करीता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2) (2) नुसार मे. सागर लगेज,(अधिकृत विक्रेते, ॲरिस्टोक्रॅट) यांचेकडून एम.आर.पी. पेक्षा 20% कमी दराने म्हणजेच प्रति नग रू.4232/- या दरानुसार 104 सुटकेस खरेदीस करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.4,40,128/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | : विषय क्र. 11 कशाच्या बाबतीत होता व मंजूर केलेला आहे का? |
| मा.सभापती | : मागिल बैठकीत प्रशासनाचा ऐनवेळचा उपकर लावण्या संदर्भात होता मंजूर केलेला आहे. |
| श्री.संजय जोशी | : यावर चर्चा होवून योग्य तो निर्णय घ्यायला पाहिजे होता. |
| मा.सभापती | : प्रशासनाचा ऐनवेळचा प्रस्ताव होता मंजूर करणे गरजेचे होते मान्यता दिली आहे. |
| श्री.संजय जोशी | : चर्चा न होता विषय मंजूर करणे त्याला अर्थ राहणार नाही. |
| मा. सभापती | : त्यावर आताही चर्चा करू शकता परंतू यानंतर सविस्तर चर्चा करून मान्यता दिली जाईल.<br>(याच वेळी स. सदस्य आपआपसात मोठमोठयाने बोलतात.) |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : विषयावर चर्चा होणे जरूरीचे आहे सर्वाना विषय कळेल यात शंका नाही. |
| मा.सभापती | : विषयपत्रिका मंजूर झालेली आहे आता जनरल चर्चा करावी. |
| श्री.रविकांत गवळी | : 1 मे रोजी सर्व शैक्षणिक वार्षिक अहवाल सादर होत असतो. महापालिकेच्या शाळेचा 1 मे रोजी निकाल जाहीर होणार आहे का ? |
| मा.सभापती | : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा. |
| शिक्षणाधिकारी | : 1 मे रोजी महापालिका शाळा, खाजगी शाळा तसेच जिल्हा परीषदेच्या शाळा यांचा सर्वसाधारण पणे निकाल जाहीर होतो. यावर्षीही निकाल जाहीर होणे अपेक्षीत होते परंतू कालच ज्यांना परीक्षा घेण्याचे ठेका दिला ते संबधीत आले होते. यावर्षी उशीरा परीक्षा झाल्यामूळे पेपर तपासणीसाठी वेळ कमी पडतो आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : ज्या एजन्सीला काम दिले होते त्यानी केले नाही म्हणून 1 मे रोजी निकाल जाहीर करू शकत नाही वस्तुस्थिती आहे. कोणत्या एजन्सीला ठेका दिला त्यांची पात्रता होती का आतापर्यत किंती पेमेंन्ट केलेले आहे. याचा खूलासा व्हावा. |
| शिक्षणाधिकारी | : शेवटचा पेपर 19 एप्रिलला संपलेला आहे. |
| श्री.संजय जोशी | : सर्वच शाळांतील परीक्षा हया साधारणपणे 18-19 एप्रिलला झालेल्या असेल. सर्वच शाळांचे निकाल 1 मे रोजी लागतात महापालिकेचा निकाल लागला जात नाही. |
| शिक्षणाधिकारी | : सर्वच शाळांतील परीक्षा एकाच कालावधीच्या दरम्यान झाल्या असल्या तरी इतर शाळांचे काम हे ज्या त्या शाळेकडे वाटप केलेले असते. महापालिकेच्या शाळेचे काम हे एकाच एजन्सीकडे होते काम करण्यासाठी 10-12 दिवस मिळाले |
| श्री.संजय जोशी | : एजन्सीच्या फायदयासाठी विदयार्थ्यांना प्रशासनाने वेठीस धरले. हे योग्य नाही. |
| श्री.रविकांत गवळी | : महापालिकेकडून व्यवस्थीत निकाल जाहीर होत नाही म्हणून एजन्सीला काम दिले होते असे होत असेल तर ठेका देवून फायदा नाही. |
| श्री.संजय जोशी | : काम देतांना एजन्सीला कोणत्या अटी शर्ती घालून दिल्या होत्या.माझे माहिती प्रमाणे जे आदेश एजन्सीला दिले त्यात मुदत वगैरे काहीही दिलेले नाही. |
| श्री.अ.रशीद खान | : निकाल उशीरा जाहीर होणार आहे याची माहिती मा. आयुक्त उपआयुक्त यांना शिक्षणाधिकारी यांनी दिली होती का ?अनेक वेळा काही बाबतीत खालचे अधिकारी वरीष्ठ अधिका-यांना माहिती देत नाही यापूर्वी तीन प्रकरण असे झालेले होते. |
| श्री.रविकांत गवळी | : एजन्सी कोणती त्या एजन्सीची पात्रता आहे का याची प्रशासनाला माहिती आहे का? |
| मा.आयुक्त | : काम एजन्सीला दिले हे माहित आहे एजन्सीचे नाव माहित नाही. |
| श्री.रविकांत गवळी | : जे पेपर त्या एजन्सीने तपासणी केले ते कशा पध्दतीने तपासणी केले प्रशासनाने याकडे लक्ष दिले का जे मार्कस दिले ते पेपर पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांनी तपासले असे वाटते. वार्षिक परीक्षेच्या एक दिवस अगोदर सराव परीक्षा घेण्यात आलेली आहे. |
| शिक्षणाधिकारी | : सराव परीक्षेची तारीख महापालिका निश्चित करते. |
| मा.आयुक्त | : शेवटच्या पेपरची तारीख 19 होती किती दिवसात निकाल देणे अपेक्षीत होते. |
| शिक्षणाधिकारी | : द्वितीय सत्र परीक्षेचा निकाल 1 मे रोजी जाहीर होतो हे सर्वांना माहितच आहे पुन्हा जाहीर करण्याची गरज नाही. |
| श्री.संजय जोशी | : निकाल किती दिवसात दयावा हे अटी शर्तीमध्ये ठरलेले होते का? |
| मा.आयुक्त | : परीक्षेची शेवटची तारीख यानंतर पूढील किती दिवसात निकाल देणार हे ठरवायला पाहिजे होते. |

| | |
|---|---|
| शिक्षणाधिकारी | : एक तारखेच्या दोन दिवस अगोदर निकाल यायला पाहिजे जेणे करून प्रगती पुस्तक तयार करावे लागते |
| श्री.रविकांत गवळी | : साधारण 1 मे रोजी निकाल लागेल हे सर्वांनाच माहीत असते. आताच म्हटले आहे. 4 दिवसापूर्वीच निकाल यायला पाहिजे होता निकाल किती टक्के लागला याची माहिती आली का? |
| शिक्षणाधिकारी | : गेल्या वर्षीही याच संस्थेनेच निकाल दिला होता तो 26 एप्रिलला सादर केला होता. याचा अर्थ या वर्षीही त्याच प्रमाणे निकाल दयायला पाहिजे होता परंतू या वर्षी बोर्डाच्या परीक्षा उशीरा झाल्यामूळे महापालिकेच्या शाळात 7 वी बोर्डचे सेन्टर असतात. त्यामूळे परीक्षो घेता आली नाही. बोर्डाची परीक्षा संपल्यानंतर इतर वर्गाच्या परीक्षा घेतल्या. |
| श्री.संजय जोशी | : उर्वरीत शाळातही परीक्षा केंद्र असतात. दिलेले उत्तर बरोबर नाही. ज्या संस्थेने 1 मे रोजी निकाल जाहीर करण्यास दिला नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार. किती रक्कम त्या संस्थेची कपात करणार हे ठरवावे जेणे करून पूढील वेळेस निकाल वेळेवर देईल. |
| मा.आयुक्त | : परीक्षेची तारीख 30 एप्रिल ठरवली तर 1 मे रोजी कुणीही निकाल देणार नाही. त्यासाठी परीक्षा झाल्यानंतर निकाल किती दिवसाच्या आत देणार याचे बंधन असायला पाहिजे. |
| शिक्षणाधिकारी | : त्या दृष्टीने कल्पना दिलेली होती आपण आपली यंत्रना वाढवून निकाल हा नेहमी प्रमाणे लागला पाहिजे निकाल शाळेवर पोहचले नाही म्हणून संबधीत एजन्सीचे लोक यांना चर्चेसाठी काल बोलविले होते. त्यावर दोन चार दिवस मुदत वाढवून दयावी म्हणून म्हटले आहे. उपआयुक्त यांचेशी चर्चा केली.असे करता येणार नाही ते योग्य पण नाही आज मा.आयुक्त यांचे निदर्शनास हे आणून देणार होते. काल चर्चेसाठी ते आले काम केले नाही याचा अर्थ काम करणार हे गृहीत होते. |
| मा.आयुक्त | : परीक्षेची तारीख आपण देतो त्यासाठी ऑर्डरमध्ये असे दयायला पाहिजे की शेवटची तारीख अमुक असले तरी निकाल हा 1 मे रोजी मिळाला पाहिजे. |
| श्री.संजय जोशी | : महापालिकेने तसे एजन्सीच्या निदर्शनास आणून दिले नाही असा खुलासा नको प्रशासनाने पाघरून घालवू नये. 19 तारखेला शहरातील सर्वच शाळांवर परीक्षा झालेल्या आहेत त्या शाळाचे निकाल कसे लागतात. |
| मा.आयुक्त | : वर्क ऑर्डरमध्ये परीक्षेच्या शेवटच्या तारखेनंतर किती दिवसानी निकाल देणार हे असायला पाहिजे. |
| श्री.रविकांत गवळी | : महापालिकेचे शिक्षक कर्मचारी परीक्षा व पेपर तपासणी करीत होते उशीर लागत असे म्हणून एजन्सीला काम दिले. पेपर व्यवस्थीत तपासले गेले की नाही हे बघीतले का? आताच अधिकारी यांनी खुलासा केला की एजन्सीच्या लोकांनी चार पाच दिवसापूर्वी निकाल देतो म्हणून म्हटले काल चर्चा झाली आता देवू शकत नाही वेळ दयावा असे म्हटले निकाल का देवू शकत नाही. ज्या एजन्सीला ठैका दिला घटक चाचणीसाठी तरतूद ठैवली गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळया परीक्ष घेतल्या जातात त्याचा मोबदला दिला जातो का, देत असेल तर किती दिला जातो तसेच घेण्यात येणा-या परीक्षा किती दिवसानंतर घेतल्या पाहिजे याची अट ठेवली आहे का? |
| शिक्षणाधिकारी | : शासनाच्या नियमाप्रमाणे परीक्ष घेतल्या जातात. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : शैक्षणिक वर्षाप्रमाणे परीक्षा केंव्हा होईल शिक्षण विभागाचे वेळापत्रक ठरलेले असते. 1 मे रोजी सर्व शाळांचे निकाल लागतात हे सर्वांना माहित असते. याच एजन्सीने मागिल वर्षी एक तारखेला निकाल दिला यावर्षी उशीर देणे हे कुणालाही मान्य होणार नाही. आपले शिक्षक जर काम करण्यास सक्षम नसेल तर त्यांना नोकरीवर ठेवायचे की नाही याचा विचार करावयास पाहिजे.जे शिकवितात त्यांनीच परीक्षा घ्यायला हव्यात चाचणी परीक्षा हया एजन्सीने घ्यायला पाहिजे. याचा विचार केला का विदयार्थ्यांची संख्या मोठी नाही निकाल दयायला पाहिजे होता अनेक संस्थेमध्ये संख्या मोठी असतांना 1 मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे. एजन्सीला समज दयावी निकाल देत नसेल तर त्यांचे रक्कम कपात करावी. जेंव्हा निकाल उशीर येणार अशी माहिती शिक्षणाधिकारी यांना मिळते तेंव्हा काही शिक्षकांना कामाला लावून निकाल हा 1 मे रोजी लावण्याची कार्यवाही व्हायला पाहिजे.1 मे रोजीच शाळेचा निकाल लागावा अशी सर्वांचीच भावना आहे. |

श्री.रविकांत गवळी : 1 ली ते 7 वी पर्यतच्या परीक्षा एकाच वेळी झाल्या बोर्ड परीक्षाचे निकाल आले का जर बोर्डाचे निकाल आले असेल तर इतर वर्गाचे निकाल का येवू शकत नाही.

श्री.अ.रशिद खान : ज्यांना ज्ञान नाही अशा लोकांनी पेपर तपासणी केले त्याची चौकशी करावी. किती मुले पास नापास होणार याची माहिती दयावी.आठ दिवसानी निकाल लावणार काही लोक मुलांना भेटण्यासाठी जातात नापास झाले काही अनुचीत प्रकार घडला तर यास जबाबदार कोण असणार आहे.

मा.आयुक्त : त्या एजन्सीने स्वतः जातीने लक्ष घालून योग्य पध्दतीने तपासणी केले नसेल शिक्षणाधिकारी यांनी विचारणा करून घ्यावी 10 टक्के पेपर किमान तपासणी करावे स. सदस्य श्री. रविकांत गवळी यांनी जे पेपरच्या बाबतीत मुद्दा मांडला त्याची तपासणी करून घ्यावी.

श्री.रविकांत गवळी : आता प्रशासन काय निर्णय घेणार आहे.

मा.आयुक्त : या क्षणी असे म्हणता येईल की जे निकाल एक तारखेपर्यत लावणे शक्य असेल रात्रदिवस काम करून उदया निकाल जाहीर करावा. जर निकाल लागणे शक्य होत नसेल तर असा रिपोर्ट पाहिजे की 19 तारखेला परीक्षा संपल्यानंतर 1 तारखेपर्यत निकाल का लावू शकले नाही संबधीत एजन्सीला जबाबदार धरता येईल. वर्कऑर्डर मध्ये परीक्षेची तारीख संपल्यानंतर किती दिवसाच्या आत निकाल द्यायला पाहिजे हे असावे. त्यांचेवर बंधन असते. 1 मे रोजी निकाल देणार आहे सर्वांना माहितच आहे असे उत्तर देणे योग्य नाही. प्रत्यक्षात शक्य नाही तर पुर्वीच का कार्यवाही केली नाही.

श्री.संजय जोशी : 1 मे रोजी निकाल जाहीर करायला पाहिजे हे अटी शर्तीमध्ये आहे का?

शिक्षणाधिकारी : अटी शर्तीमध्ये 1 तारखेचा उल्लेख नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सदर एजन्सीवर बंधन घातले नसेल व ज्यांनी करार होता त्यांना जबाबदार धरावे.

श्री.रविकांत गवळी : 20-30 मूले एका वर्गात आहे. पाच ते सहा वर्गाचे निकाल जाहीर करायचे एवढा उशीर का होतो.4 थी व 7 वी बोर्डचे निकाल आलेला आहे ते जाहीर करणार की नाही.

मा.आयुक्त : बोर्डचा निकाल आला असेल तर जाहीर केला जाईल.

श्री.संजय जोशी : हा विषय समोर आला नसता तर 4 वी 7 वीचे निकाल सुध्दा जाहीर केले नसते. असे यावरून दिसते.

शिक्षणाधिकारी :बोर्डचा निकाल मुख्याध्यापक जि. प. मधून घेवून येतात काहीनीआणले काही शाळेचे आले नसेल.

मा.आयुक्त :1 मे रोजी बोर्डने निकाल जाहीर केले असेल तर आपण निकाल जाहीर करू.

श्री.वसंत नरवडे पाटील : दोन दिवसापूर्वी स्थानिक पेपरमध्ये बातमी आली की वितरण कंपनीने महापालिकेकडे असलेली 240 कोटीची वीज थकबाकी भरणा न केल्यास पाणीपूरवठा बंद करणार याबाबत महापालिकेने काय भुमिका घेतली आहे.ते देण्याची तरतुद आहे का की शासनाकडून माफ करून घेणार शासन दरबारी कोण जाणार यापूर्वी माफी दिली तर काय कार्यवाही केली या सर्व बाबतीत चर्चा घडवून यावी.

मा.आयुक्त : ही रक्कम देणे आहे. त्या विभागाचे पत्र मिळालेले आहे. 240 कोटी वन टाईम सेटलमेंन्ट करण्यासाठी एक प्रस्ताव पाठविला असून तो एमएसईबीच्या व्यवस्थापकीय संचालकाने मान्य केलेले आहे. वसुली कमेटीमध्ये ठेवले होते. कमेटीने आणखी विचारणा केली आहे. रिकवरी कमेटीची मान्यता झाल्यानंतर महापालिकेला लेखी कळवतील. सबंधीत विभागाकडून नोटीसेस येतात परंतू जो प्रस्ताव आहे त्यावर आपण अंतिम निर्णय कळवावे असे उत्तर देतो. 240 कोटीचा प्रस्ताव एमईआरसीच्या गाईडलाईन्सच्या आत राहून त्यास मान्य करायचे आहे. अंतिम टप्प्यात आहे. दुसरे युनिट रेटच्या संदर्भात होते. कृषी दराने लावण्यात यावे. म्हणून मागणी केली. कमेटीमध्ये हा रेग्यूलर रेट कमी करण्याचा प्रस्ताव मान्य करून घेवू.

श्री.वसंत नरवडे पाटील : पाणीपट्टी वसुली तसेच अनधिकृत नळ कनेक्शन याकडे लक्ष देणार की नाही. प्रत्येक सरकारने माफ करायचे व पुर्वी प्रमाणे चालत राहणार हे योग्य नाही. वसूलीच्या बाबतीत एक कार्यक्षम क्षेत्र प्रशासन तयार करू शकत नाही का? प्रशासन अधिका-यांना पाठीशी घालणार असेल तर कर्मचा-यांचे पगार होणार नाही. आर्थीक अडचणीत सापडतील याची दखल घ्यावी.

श्री.संजय जोशी : एमएसईबीचे जे बोर्ड ऑफ अपील आहे त्यांचेकडे महापालिकेने अपील केले सर्व कार्यवाही केली शासनाकडे पाठपूरावा केला होता.

मा.आयुक्त : या संदर्भात मा.मुख्यमंत्री तसेच मा.अर्थमत्री यांना मा. महापौरांच्या सहिने पत्र दिलेले आहे. प्रथमतः एमएसईबीने मान्य करायचे आहे. नंतर शासनाकडे जाईल प्रस्ताव ठेवला होता वाटाघाटी पण झालेली आहे. वन टाईम सेटलमेन्ट करण्यासाठी महापालिकेची तेवढी आर्थिक स्थिती असायला पाहिजे. त्या बाबतीत मार्ग काढलेला आहे जो एमएसईबीने मान्य केले 90 टक्के काम झाले समजावे त्यानंतर शासनाकडे जाईल.

श्री.कचरू मोरे : ज्या प्रभाग कार्यालयाचे स्वच्छतेचे खाजगीकरण केले ती एजन्सी कामगारांना 141 रू ऐवजी 60 रू प्रमाणे पगार देत आहे.कामगारांना वेठीस धरत आहे एक दिवस सुटटी दिली जात नाही पगार कपात करतात. त्यांना नियमाने वेतन मिळावे यासाठी बँकेकडून पगार व्हावा. त्या कामगारानी काम बंद अंदोलन केले होते याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

मा.सभापती : नियमाने त्या कामगारांना न्याय मिळावा.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद